इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या “ज्ञानज्योजी सावित्रीबाई फुले आधार योजना” मध्ये सुधारीत अटींचा समावेश करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक : आधार-२०२६/प्र.क्र. १३८/ई-ऑफिस क्र.-१८६२९९९/योजना-१,**
नविन प्रशासकीय भवन, ३ रा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादामा कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :- १५ ऑक्टोबर, २०२६.**

वाचा :- १. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५, दि.१३.१२.२०२३
२. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५, दि.११.०३.२०२४
३. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र. आधार-२०२५/प्र.क्र. १६८/योजना-१, दि.०३.११.२०२५

प्रस्तावना :-

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थ्यांकरिता “ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना” राबविण्यास दि.१३.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच, सदर योजना राबविण्यासाठी आवश्यक निकष व अटी दि.११.०३.२०२४ व दि.०३.११.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आल्या आहेत. त्यापैकी, काही अटींमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय :-</u>**

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" या योजनेसाठी पुढील अटींचा समावेश करण्यात येत आहे.

(१) आधार योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी ज्या जिल्हयांच्या ठिकाणी ( शहरामध्ये ) शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहेत, अशा जिल्ह्यांत आधार योजनेचा लाभ जिल्हास्तरावरील महाविद्यालयांसाठी घ्यावयाचा असेल तर प्रथम शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे. ज्या जिल्ह्यांच्या ठिकाणी अद्याप वसतिगृह सुरू करण्यात आले नाही तसेच, तालुक्याच्या ठिकाणी वसतिगृह सुरू करण्याचे धोरण नसल्यामुळे, सदर जिल्ह्यांच्या ठिकाणी विद्यार्थ्यास थेट ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेकरीता अर्ज करता येईल.

(२) विद्यार्थ्यांने स्वतःचा आधार क्रमांक आपल्या राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संलग्न करणे बंधनकारक आहे संबंधित आधार संलग्न बँक खात्यामध्ये डीबीटीद्वारे रक्कम जमा करण्यात येईल.

(३) दहावीनंतर पदविका (DIPLOMA) अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन पदविकाचा अभ्यासक्रमास पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमाच्या थेट व्दितीय वर्षात प्रवेश दिला जातो. अश्या विद्यार्थ्यास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट करताना पदविका (DIPLOMA) अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाचे गुण ग्राह्य धरावेत. या गुणांची किमान मर्यादा ५०% असणे आवश्यक आहे.

(४) योजनेचा लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन उपस्थिती ७५% अनिवार्य आहे. त्यासाठी विद्यार्थ्याने प्रत्येक संबंधित शैक्षणिक संस्थेकडून प्रत्येक तिमाहीची हजेरी प्राप्त करुन घेऊन, तिमाही संपल्यानंतर पोर्टलवर १५ दिवसाच्या आत सादर (UPLOAD) करणे आवश्यक आहे.

(५) विद्यार्थ्यांने ऑनलाइन अर्ज करताना CGPA चे टक्केवारी (PERCENTAGE) मध्ये रूपांतर करून त्याबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. सदरहू प्रमाणपत्र अर्जासोबत सादर न केल्यास प्रस्तुत विद्यार्थी योजनेकरिता अपात्र समजण्यात येईल.

(६) ज्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर (POST MATRIC) योजनेत शासनाकडून निर्वाह भत्त्याचा लाभ मिळाला आहे, त्यांना या योजनेमधून पूर्ण निर्वाह भत्ता मिळणार नाही. यासाठी सदर विद्यार्थ्याने संबंधित महाविद्यालयाकडून प्रमाणपत्र प्राप्त करून ONLINE अपलोड केल्यानंतरच विद्यार्थ्यास उर्वरित रक्कम अदा करण्यात येईल.

(७) सदर योजनेंतर्गत शासन निर्णय क्र. आधार-२०२५/प्र.क्र.१६८/योजना-१, दि. ०३ नोव्हेंबर, २०२५ नुसार परिक्षेत्राच्या सीमा व विद्यार्थ्यास परिक्षेत्रानुसार देय रक्कमेत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

| अ.क्र | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर या ठिकाणी तसेच (महानगरपालिकेच्या हद्दीपासून ५ कि. मी. परिसरात) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसूली विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगर पालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्हयाच्या ठिकाणी तसेच महानगर पालिकेच्या (अनु.क्र.२ वगळून) हद्दीपासून ५ कि.मी. परिसरात असलेली महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था या ठिकाणी अनुज्ञेय रक्कम | तालुक्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम (रकाना २,३ व ४ मधील क्षेत्र वगळून इतर क्षेत्र) |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | २ | ४ | ५ |
| १ | भोजन भत्ता | रू.३२,०००/- | रू.२८,०००/- | रू.२५,०००/- | रू.२३०००/- |
| २ | निवास भत्ता | रू.२०,०००/- | रू.१५,०००/- | रू.१२,०००/- | रू.१००००/- |
| ३ | निर्वाह भत्ता | रू.८,०००/- | रू.८,०००/- | रू.६,०००/- | रू.५०००/- |
| **प्रति विद्यार्थी एकुण देय रक्कम (१० महिन्यांसाठी** | | **रू.६०,०००/-** | **रू.५१,०००/-** | **रू.४३,०००/-** | **रू.३८०००/-** |

(८) महानगरपालिकेच्या हद्दीपासून ५ कि. मी. परिसरात महाविद्यालय असल्याबाबतचे संबंधित महाविद्यालयाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास विद्यार्थ्यास तालुका स्तरावर देय असलेली रक्कम अदा करण्यात येईल.

(९) एका तालुकास्तरावरील विद्यार्थ्याचा महाविद्यालयीन प्रवेश, दुसऱ्या तालुक्याच्या ठिकाणी झाल्यास महाविद्यालय व विद्यार्थ्यांचे कायम निवासाचे ठिकाण यामधील अंतर हे २० कि.मी पेक्षा जास्त असल्यास संबंधित विद्यार्थ्यास तालुकास्तरीय लाभ अनुज्ञेय राहील.

(१०) काही अभ्यासक्रमाचे कालावधी हा ५ वर्षाचा असतो. त्यामुळे, या योजनेकरिता पात्र झालेले विद्यार्थी हे त्यांच्या अभ्यासक्रमाच्या पदवीच्या विहित कालावधीसाठी पात्र असतील.

(११) विद्यार्थ्यांस ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ ज्या ताखेपासून मंजूर झाला, त्या तारखेपासून लाभ न देता विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम ज्या तारखेपासून सुरु झाला त्या तारखेपासून विद्यार्थ्यास लाभ देण्यात यावा,

(१२) सदर योजनेंतर्गत नियमित पात्र विद्यार्थ्याने नुतनीकरणाकरिता अर्ज सादर न केल्यास, सदर विद्यार्थ्यांस या योजनेच्या लाभाची गरज नाही असे समजून त्यांना देय असलेल्या योजनेचा लाभ न देता, सदरच्या जागा रिक्त समजण्यात यावी व नुतनीकरण न झालेल्या जागा अनुक्रमे प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष व चतुर्थ वर्ष याप्रमाणे आरक्षणानुसार भरल्या जातील.

(१३) आंतरपरिवर्तनाने भरण्यात येणाऱ्या जागा या आरक्षणानुसारच प्रथमत: प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या अर्जनुसार भरण्यात येतील. तरीही जागा रिक्त राहिल्यास आरक्षणानुसार अनुक्रमे व्दितीय, तृतीय व चतुर्थं वर्षातील विद्यार्थ्यांना याप्रमाणे लाभ देण्यात येईल. तरीही जागा रिक्त राहिल्यास आंतरप्रवर्गनिहाय भरण्यात येतील.

(१४) पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना १२ वी मध्ये किमान ५०% गुणांची अट राहील. तसेच, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे पदवीचे गुण विचारात घेण्यात यावे. सदर गुण किमान ५०% असणे आवश्यक आहे.

(१५) ज्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीनुसार शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला आहे. परंतु, शासकीय वसतिगृहापासून विद्यार्थ्यांचे महाविद्यालय १५ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर असेल आणि विद्यार्थ्याला ते गैरसोयीचे होत असेल तर अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या सहमतीने नियमानुसार ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ देता येईल.

२.	सदर योजनेकरीता संदर्भीय शासन निर्णय दि.१३.१२.२०२३ व दि.११.०३.२०२४ मधील इतर अटी व शर्ती या कायम राहतील.

३.	सदरहू शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१०१५१८०६३७९०३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

DINESH ROHIDAS CHAVAN

Digitally signed by DINESH ROHIDAS CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE, 2.5.4.20=710100F49F6FEBD6B7D4E931019C4DB852728FB51C38DC86F98376D9A13C1211, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C2377ED235498603821D49922A210871FF6FB9B369722AC707AEE7DCD87F2BD, cn=DINESH ROHIDAS CHAVAN
Date: 2026.10.15 18:09:35 +05'30'

**(दिनेश चव्हाण)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२. मुंबई/नागपूर.
२) मा. मंत्री (इ.मा.ब.क.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, यांचे मंत्रालय, मुंबई.
४) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.
५) सर्व प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.
६) सर्व सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.
७) निवासी लेखा परिक्षक, मुंबई.
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१०) निवड नस्ती (योजना-१).